स.के.नं. ७८/२०२०

नि.क्र. १२/क लगत...

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – अनिता विजय नवत्रे

वय – २८ वर्षे

व्यवसाय – नोकरी, रा.उ.शु. पनवेल

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. कदम यांच्यामार्फत...</u>**

१. दिनांक १५.०३.२०१९ रोजी मी रा.उ.शु. उरण येथे कार्यरत होते. त्यादिवशी गुप्त माहिती मिळाली की, आरोपी साई चायनिज ढाबा सुरूंगपाडा येथे देशी दारूची विक्री करत आहे. त्यावरून मी, इतर स्टाफ व दोन पंचांसह आरोपीवर दुपारी ३.३० वाजता छापा घातला. तेथे आरोपीच्या ताब्यात २४ प्रत्येकी १८० मिली. च्या देशी दारूच्या बाटल्या प्लास्टीकच्या गोणीमध्ये मिळून आल्या. आरोपीच्या ताब्यात मिळून आलेला मुद्देमाल एल.एन.पाटील यांनी पंचनामा करून जप्त केला. मुद्देमालापैकी २ बाटल्या रासायनिक तपासणीकरीता राखून ठेवण्यात आल्या.

२. त्यानंतर आम्ही आरोपीला फौ.प्र.सं. कलम ४१ प्रमाणे नोटीस देउन सोडून दिले. मी आरोपीविरूद्ध फिर्याद दाखल केली. आता मला सदरची फिर्याद दाखवली, ती तीच आहे. त्यावर माझी सही आहे. मजकूर खरा व बरोबर आहे. **<u>फिर्यादला नि.क्र. १५</u>** देण्यात येत आहे. मी स्वतः मुद्देमाल पत्रासह रासायनिक प्रयोगशाळेत दिनांक १७.०५.२०१९ रोजी जमा केला. कार्यालयात पुरेसे मनुष्यबळ नसल्याने मुद्देमाल तपासणीकरीता पाठवण्यास उशिर झाला. आरोपी आज

न्यायालयात हजर आहे.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. मुंबईकर यांच्यामार्फत...</u>**

नि.क्र. १६ वरील आदेशानुसार उलटतपास तहकुब.

श्रवणोत्तर स्विकृत

उरण, (विकास डी. बडे)

दिनांक – ०६.१२.२०२३ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उरण